# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026

YEAR : 50 ) 15th December 2025 ( No. of Pages 12 ) ( No : 19


## MINUTES

**of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS'ASSOCIATION held at 12.00 noon on *SUNDAY, the 16th November, 2025 at***

***ANIKET COLLEGE OF SOCIAL WORK, STATION FAEEL, DEOLI ROAD, WARDHA***

General Body of Nagpur University Teachers' Association met at 12.00 noon on Sunday, the 16th November, 2025 at Aniket College of Social Work, Station Faeel, Deoli Road,Wardha.

Prof. P.B. Raghuwanshi President was in the chair. The membership numbers of the members present at the meeting are as follows :-

0478, 0587, 1177, 1380, 1792, 1917, 2255, 2373, 2392, 2715, 2949, 3123, 3341, 3392, 3432, 3449, 3492, 3548, 3550, 3578, 3595, 3621, 3631, 3691, 3728, 3772, 3852, 4019, 4076, 4097, 4108, 4262, 4346, 4498, 4543, 4626, 4833, 4867, 5000, 5052, 5085, 5093, 5104, 5233, 5240, 5261, 5271, 5298, 5306, 5307, 5309, 5312, 5395, 5419, 5420, 5428, 5433, 5443, 5478, 5585, 5590, 5689, 5733, 5745, 5816, 5830, 5885, 5914, 5927, 6072, 6119.

Signed sheets of papers recording the attendance are included on pages 150 to 153 of and will form part of, the "BOOK OF ATTENDANCE" of General Body meetings.

Agenda of the General Body meeting was circulated on pages 229 to 230 of 2025 NUTA Bulletin and Additional Agenda was circulated on pages 46 & 47 2025 Ex-File.

### ITEM NO. 899 :
### *CONFIRMATION OF MINUTES :*

**CONFIRMED** the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association held at 12.00 noon on Sunday, 29th June, 2025 at Shri Shivaji Arts & Commerce College, Amravati.

***Notes :- (1)*** *Copy of the minutes was Circulated on pages 145 to 146 of 2025 NUTA Bulletin.* ***(2)*** *Corrections, if any, were invited in the copy of the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association held at 12.00 noon on SUNDAY, the 29th June, 2025 vide No.CIM/56 Dated 15th July, 2025 published on page 145 of 2025 NUTA Bulletin. No correction was received.*

### *विषय क्रमांक ८९९ (१) : प्रा.देविदास उपाख्य भाऊसाहेब बेलसरे यांचे दुःखद निधन*

प्रा.देविदास उपाख्य भाऊसाहेब बेलसरे यांच्या दुःखद निधनाबद्दल प्रा.डॉ.सुभाष गावंडे यांनी मांडलेला **पुढील शोकप्रस्ताव संमत करण्यात आला.** :-

प्रा.देविदास ऊर्फ भाऊ बेलसरे हे नुटा संघटनेचे आजीवन सदस्य होते. त्यांचा आजीवन सदस्य क्रमांक हा ४८ आहे. त्यांनी अहोरात्र झटून संघटनेला मजबूत करण्याचे काम केले. १९६०-७० च्या दशकातील एक झुंजार आक्रमक आणि कलात्मक शैलीचे कबड्डीपटू भाऊ त्यांनी अमरावतीच नव्हे तर संपूर्ण विदर्भाचे नाव राष्ट्रीय क्रीडा पटलावर उजागर केले. अशा या कर्मठ क्रीडा महर्षिने वयाच्या ८७ व्या वर्षी ३० जुलै २०२५ रोजी जगाचा निरोप घेतला.

सन १९६७ मध्ये भाऊ श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयात म्हणजेच पूर्वाश्रमीच्या राज महाविद्यालयात रूजू झाले. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात अनेक राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण केले व महाविद्यालयाला एक क्रीडापंढरीचे रूप दिले. भाऊंचे कार्यक्षेत्र हे फक्त खेळ व खेळाडू पर्यंतच मर्यादित नव्हते तर त्यांची खरी ओळख ही सर्वांना एक क्रीडाशिक्षक, एक उत्कृष्ट संघटक आणि एक निष्ठावान कार्यकर्ता म्हणून आहे. नागपूर व अमरावती विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांवर त्यांनी उत्कृष्ट काम केले होते. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल ही सभा तीव्र शोकसंवेदना व्यक्त करीत आहे.

### *विषय क्रमांक ८९९ (२) : डॉ.प्रकाश काकडे यांचे दुःखद निधन*

डॉ.प्रकाश काकडे यांच्या दुःखद निधनाबद्दल डॉ.हेमंतकुमार बागडे यांनी मांडलेला **पुढील शोकप्रस्ताव संमत करण्यात आला.** :-

डॉ.प्रकाश रामचंद्र काकडे यांचा आजीवन सभासद क्रमांक ४३३९ हा आहे. त्यांचे दि. १२.०९.२०२५ ला अपघातात निधन झाले. निधन समयी त्यांचे वय ५८ वर्षे होते. ते १९९३ पासून सावनेर येथील भालेराव विज्ञान महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागप्रमुख म्हणून कार्यरत होते. नुटा संघटनेच्या अनेक आंदोलनात त्यांनी सक्रिय सहभाग घेतलेला होता. त्यांच्या अकाली निधनाने काकडे परिवारातील सदस्यांवर दुःखाचा डोंगर कोसळलेला आहे. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल ही सभा तीव्र शोकसंवेदना व्यक्त करीत आहे.

### *विषय क्रमांक ८९९ (३) : प्रा.सु.वा.साठे यांचे दुःखद निधन*

प्रा.सु.वा.साठे यांच्या दुःखद निधनाबद्दल डॉ.दिनेश पुंड यांनी मांडलेला **पुढील शोकप्रस्ताव संमत करण्यात आला.** :-

विदर्भ महाविद्यालय, अमरावती येथून रसायनशास्त्र विषयाचे विभाग प्रमुख म्हणून सेवानिवृत्त झालेले प्रा.सु.वा.साठे (आजीव सदस्य क्र. २६९७) यांचे नुकतेच वयाच्या ९३ व्या वर्षी नागपूर येथे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांनी आपल्या कार्यकाळात विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, संस्कार आणि मूल्यांचे रोपण करून शिक्षणसेवेत मोलाचे योगदान दिले. त्यांचे व्यक्तिमत्त्व साधे, विनम्र, कर्तव्यनिष्ठ आणि प्रेरणादायी होते. त्यांच्या निधनाने शैक्षणिक क्षेत्राने एक समर्पित, निष्ठावान आणि आदर्श शिक्षक गमावला आहे. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल ही सभा तीव्र शोकसंवेदना व्यक्त करीत आहे.

**सभेने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना आपली आदरांजली वाहिली.** संमत केलेल्या शोकप्रस्तावाची प्रत संघटनेच्या वतीने सचिव शोकाकुल कुटुंबियांकडे पाठवितील असे सभाध्यक्षांनी सांगितले.

### ITEM NO. 900 :
### *APPROVAL TO THE AUDITED STATEMENTS :*

**CONSIDERED** and **APPROVED** the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account of the Association for the year ended on 31st March, 2025.

***Notes*** : ***(i)*** *The copy of the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account of the Association for the said Financial year was circulated on page 231 & 232 of 2025 NUTA Bulletin.* ***(ii)*** *The Audited Balance Sheet and Income and Expenditure Account were placed before the General Body by Dr. Dilip Hande, Treasurer, on behalf of the Executive Committee.*

### ITEM NO. 901 :
### *STATEMENT ON FIXED SECURITIES POSITION :*

**NOTED** the Statement no. 36 showing the position of

the Fixed Securities of the Association as on 31st March, 2025.

*Note : (i) Statement no. 36 regarding the fixed securities of the Association as on 31st March, 2025 was circulated on page 233 of 2025 NUTA Bulletin. (ii) The Statement showing the position of the Fixed Securities of the Association as on 31st March, 2025, were placed before the General Body by Dr.Dilip V. Hande, Treasurer, on behalf of the Executive Committee.*

## ITEM NO. 902 :
## *APPOINTMENT OF THE AUDITORS :*

**CONSIDERED AND APPROVED** the following resolution for the appointment of Auditors for the Financial year ending on 31st March, 2026 namely :-

**"C.R.Sagdeo & Co. Chartered Accountant "Prabha Niwas'' Nagpur be appointed as auditor for the Financial year ending on the 31st March 2026"**

*Notes : (i) As per Article VII of the Constitution of NUTA the "General Body shall appoint auditors annually in the Annual Meeting of the Association." (ii) The Executive Committee resolved to recommend the above resolution, (Vide item No. 46 of 2025) which was placed before the General Body for its approval. (iii) Dr. Dilip Hande Treasurer, on behalf of the Executive Committee, moved the resolution.*

## विषय क्रमांक ९०३ :
## *मा.सरन्यायाधिशावरील निषेधार्ह हल्ला*

**कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा.डॉ.काशिनाथ बऱ्हाटे यांनी मांडलेला पुढील प्रस्ताव विचारात घेण्यात आला व संमत करण्यात आला :-**

**१.** श्रद्धा व अंधश्रद्धा यामधील सिमारेषा ही अनेकदा अतिशय पुसट असल्याचे दिसून येते. अंधश्रद्धेच्या सुळसुळाटामुळे अनेक गोरगरिबांना वर्षानुवर्षे पिळवणुकीला सामोरे जावे लागले व लागत आहे. कार्यकारण संबंध विशद करून व विज्ञानवादी विचारांचा प्रचार करून अंधश्रद्धेने पोळलेल्या गोरगरिबांना अंधश्रद्धेच्या पिळवणुकीपासून मुक्त करण्यासाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या थोर समाजसुधारकांची व विचारवंतांची परंपरा महाराष्ट्राला लाभलेली आहे. या थोर परंपरेतील एक वंदनीय समाजसुधारक श्री संत गाडगे महाराज यांच्या शेवटच्या कीर्तनातील एक लहानसा भाग उद्धृत करण्यासारखा आहे. त्यांच्या शेवटच्या ध्वनिमुद्रित कीर्तनातील याबाबतचा लहानसा भाग शब्दशः पुढीलप्रमाणे आहे. :-

"आपले देव बसोले देवळांत, तुमच्या देवाले, आंग धुता येते का?

नाऽऽही !

ज्याले आंग धुवायची अक्कल नाही त्याला देवच म्हणता? तुमच्या देवाले धोतर नेसतां येते का?

नाऽऽही !

ज्याऽऽला धोतरही नेसता येत नाही त्याला देवच म्हणता? तुमच्या देवापुढे निवद ठेवला - कुत्रं भिडलं, तर कुत्रं हाणता येते का?

नाऽऽही !

कुत्रंही हाणायची ज्याच्या अंगात ताकद नाही त्याला देव म्हणता? बर तुमच्या देवाचा देवळापुरता तरी आंत उजेड पडते का?

नाऽऽही !

ईझला दिवा, मंडळी आली, बापूराव दिवा लावा, मंडळी दर्शनाला आली, आणा दिवा, देव कोणी दाखोला?

दिव्यानं !

दिवा मोठा की देव मोठा?

दिऽऽवा !

देवळात देव नाही. देव कुठं आहे? या जगांत देव आहे. जगाची सेवा करा."

**२.** सर्वोच्च न्यायालयातील एका घडामोडीमध्ये सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश मा.भूषण गवई यांनी उपरोक्त विचारांचे प्रतिनिधित्व करणारे एक वाक्य वापरले त्यावरून तद्परांत ७१ वर्षाच्या एका वकिलाने त्यांच्यावर भर न्यायालयात हल्ला करण्याचा प्रयत्न केला. संपूर्णपणे तार्किक व विवेकाधिष्ठित ते वाक्य सहन न झाल्यामुळे अंधश्रद्धेची जपणूक करण्याच्या हेतुने हा हल्ला करण्यात आलेला आहे असे एकंदर चित्र आहे. **हल्लेखोराच्या या भ्याड हल्ल्याचा जेवढा निषेध करावा तेवढा थोडाच आहे.**

**३.** हा हल्ला झाला असताना सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश मा.श्री.भूषण गवई यांनी या प्रसंगाला अत्यंत धीरोदात्तपणे तोंड दिले. "अशा प्रकारामुळे मी विचलित होत नाही, तुम्ही कोणीही विचलित होऊ नका" असे सांगून सुनावणीत असलेल्या प्रकरणाची सुनावणी त्यांनी पुढे सुरू ठेवली. **त्यांचे हे धीरोदात्त वर्तन उपरोक्त थोर समाजसुधारकांच्या व विचारवंतांच्या परंपरेला साजेसे होते असे ठामपणे म्हणता येईल.**

**४.** अंधश्रद्धांच्या सुळसुळाटामुळे वर्षानुवर्षे पोळून निघालेल्या गोरगरिबांच्या त्यापोटी होणाऱ्या हालअपेष्टा संपुष्टात येण्याचा मार्ग व त्यावरील प्रवास किती कठीण आहे हे या सर्वोच्च न्यायालयाच्या स्तरावर झालेल्या प्रकारामुळे साऱ्या देशाच्या लक्षात आले. **ही या प्रकरणातून झालेली एक लहानशी अप्रिय उपलब्धी म्हटली पाहिजे.**

## ITEM NO. 904 :
## *ANNOUNCEMENT IN RESPECT OF CHANGE OF ADDRESS :*

**NOTED** the announcement in respect of Change of address : Acknowledgment No. 39.

*Notes : (1) Announcement in respect of Change of address : Acknowledgment No. 39 was circulated on page 230 of 2025 NUTA Bulletin.*

*(2) List No. 45 of Changed Addresses is circulated on page 40 of 2025 Ex. file. List No. 45 contains Sr.No. 1803 to 1853 of Changed Addresses.*

*(3) Previous publication of change of addresses Acknowledgement in NUTA Bulletin : Change of Addresses Acknowledgement No. 38 was published on page no. 283 of 2021 NUTA Bulletin in respect of List No. 44 of Changed Addresses.*

## विषय क्रमांक ९०५ :
## सेवानिवृत्ती वेतन व्यवस्था विशेषांकाचे विमोचन

नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) वतीने दिनांक १ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या नुटा बुलेटीनच्या **"सेवानिवृत्ती वेतन व्यवस्था विशेषांकाची" नोंद घेण्यात आली.** *(सदरहू विशेषांक एकूण ५६ पृष्ठांचा असून सन २०२५ च्या बुलेटीन मालिकेत त्याचे पृष्ठ क्रमांक १७३ ते २२८ आहेत. सदर विशेषांकाचे वितरण आमसभेमध्ये करण्यात आले. सदरहू विशेषांक संघटनेच्या www.nuta.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)*

## ITEM NO. 906 :
## *APPOINTMENT OF 8TH PAY COMMISSION :*

**NOTEED** the Government of India Notification dated 3rd November 2025 regarding appointment of 8th Pay Commission.

*Note:- Copy of the Notification was circulated on page 46 & 47 of 2025 Ex-File, now it is circulated on page **339 of 2025** NUTA Bulletin.*

## *विषय क्रमांक ९०७ :*
## *गणसंख्या :*

नुटाच्या घटनेतील खंड ५ मध्ये असलेल्या तरतुदीनुसार गणसंख्येच्या अभावी सुरुवातीला सभा अर्धा तासासाठी तहकुब करण्यात आली होती, **ही बाब कार्यवृत्तामध्ये नोंदविण्यात येत आहे**, असे अध्यक्षांनी जाहीर केले.

## विषय क्रमांक ९०८ :
## *आभार*

**सभा व्यवस्थेबद्दल आभार** : कार्यकारी मंडळाच्या वतीने अध्यक्षांनी महाविद्यालयाचे प्राचार्य व स्थानिक शाखेचे इतर प्राध्यापक, जिल्हा नुटाचे अध्यक्ष, सचिव व सदस्य, यांनी ही सभा यशस्वी करण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल आणि दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. शेवटी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून **सभा संपली असे अध्यक्षांनी जाहीर केले.**

| | |
|---|---|
| स्वा / **प्रा. पी. बी. रघुवंशी** | स्वा / **डॉ.नितीन कोंगरे** |
| ***अध्यक्ष*** | ***सचिव*** |

*****

The Gazette of India

EXTRAORDINARY : PART I : SECTION 1 : PUBLISHED BY AUTHORITY

No. 322 : New Delhi, Monday, November 3, 2025 : Kartika 12, 1947

**MINISTRY OF FINANCE**

(Department of Expenditure)

**RESOLUTION**

**New Delhi, the 3rd November, 2025**

**F. No. 01-01/2025-E.III(A).—**The Government of India have decided to appoint the Eighth Central Pay Commission comprising of the following:-

1. Chairperson - Smt. Justice Ranjana Prakash Desai

2. Member (Part-Time) - Prof. Pulak Ghosh

3. Member-Secretary - Shri Pankaj Jain

**2.** The terms of reference of the Commission will be as follows:-

**(a)** To examine and recommend changes that are desirable and feasible in the emoluments including pay, allowances, and other facilities/ benefits, in cash or kind, having regard to rationalization, contemporary functional requirements and the specialized needs of various Departments, agencies and services in respect of following categories of employees:

(i) Central Government employees — industrial and non-industrial;

(ii) Personnel belonging to the All India Services;

(iii) Personnel belonging to the Defence Forces;

(iv) Personnel of the Union Territories;

(v) Officers and employees of the Indian Audit and Accounts Department;

(vi) Members of the regulatory bodies (excluding the RBI) set up under the Acts of Parliament;

(vii) Officers and employees of the Supreme Court;

(viii) Officers and employees of the High Courts whose expenditure is borne by the Union Territories; and

(ix) Judicial officers of the subordinate courts in the Union Territories.

[**Note:** In respect of judicial officers, the Commission shall adhere to the principle enunciated by the Supreme Court in its Judgement dated 24th August, 1993 in All India Judges' Association and Others V/s Union of India and Others, viz. that there shall be no link between service conditions of judges and administrative executive and that the service conditions of judges have to meet the special needs of the judiciary].

**(b)** To work out an emolument structure conducive to attracting talent to Government service, promoting efficiency, accountability and responsibility in the work culture.

**(c)** To examine the existing schemes of bonus with a view to improving performance and productivity and make recommendations on the general principles, financial parameters, productivity and performancelinked parameters for an appropriate incentive Scheme to reward excellence in productivity and performance.

**(d)** To review the existing allowances and conditions of their admissibility and recommend their rationalization keeping in view the multiplicity of allowances.

**(e)** (i) To review the Death-cum-Retirement Gratuity of employees borne on the National Pension System (including Unified Pension Scheme) and make recommendations thereon.

(ii) To review the Death-cum-Retirement Gratuity and pensions of employees not borne on the National Pension System (including Unified Pension Scheme) and make recommendations thereon keeping in view Para f(iii) below.

**(f)** To make recommendations on the above, keeping in view:

(i) The economic conditions in the country and the need for fiscal prudence;

(ii) The need to ensure that adequate resources are available for developmental expenditure and welfare measures;

(iii) The unfunded cost of non-contributory pension schemes;

(iv) The likely impact of the recommendations on the finances of the State Governments which usually adopt the recommendations with some modifications; and

(v) The prevailing emolument structure, benefits and working conditions available to employees of Central Public Sector Undertakings and private sector.

**3.** The Commission will devise its own procedure and may appoint such Advisors, Institutional Consultants and Experts, as it may consider necessary for any particular purpose. It may call for such information and take such evidence, as it may consider necessary. Ministries and Departments of Government of India shall furnish such information and documents and other assistance as may be required by the Commission. The Government of India trusts that State Governments, Service Associations and others concerned will extend to the Commission their fullest cooperation and assistance.

**4.** The Commission will have its headquarters in Delhi.

**5.** The Commission will make its recommendations within 18 months of the date of its constitution. It may consider, if necessary, sending interim reports on any of the matters as and when the recommendations are finalized.

**V. VUALNAM, Secy.**

**ORDER**

ORDERED that the Resolution be published in the Gazette of India.

ORDERED also that a copy of the Resolution be communicated to the Ministries/Departments of the Government of India, State Governments/ Administrations of Union Territories and all others concerned.

**V. VUALNAM, Secy.**

*****

Registered Under Trade Union Act 1926 No. by II-8162 of 1985
**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS ORGANIZATION (MFUCTO)**
**University Club House, B-Road, Charchgate, Mumbai-400 020**

PRESIDENT
**Prof. Dr. S. P. Lawande**
Email : splawande@gmail.com
Mob.- 09422228174

GENERAL SECRETARY
**Prof. Dr. P. B. Raghuwanshi**
Email : pbraghuwanshi@gmail.com
Mob.- 09422155603

**Ref.No. : MFUCTO/EC-06/25 : Date : 17.11.2025**

मा.महामहीम राज्यपाल महोदय,
राजभवन, मलबार हिल, मुंबई-४०००३५

**विषय :** सहाय्यक प्राध्यापक पद भरतीचा दि. ०६ ऑक्टोबर, २०२५ चा शासन आदेश रद्द करणेबाबत नम्र निवेदन.

**संदर्भ :** दि. ०६ ऑक्टोबर २०२५ चा शासन आदेश रद्द करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषय संदर्भानुसार, राज्यातील सार्वजनिक विद्यापीठामधील (अकृषि) अध्यापकांच्या भरती प्रक्रीयेमध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी कार्यपद्धती विहित करण्याबाबत शासन आदेश निर्गमित करण्यात आला आहे.

(१) उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थामधील अध्यापकांकरीता विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (UGC) शैक्षणिक अर्हता आणि अनुषंगिक बाबी विहित करण्यात येतात. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून दि. १८ जुलै, २०१८ च्या अधिसूचनेद्वारे उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांकरिता "Minimum qualifications for appointment of teachers and other academic staff in Universities and Colleges and Measures for the maintenance of standards in Higher Education" निश्चित करण्यात आली आहेत. **सदर अधिसूचनेतील तरतुदी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि. ८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयान्वये राज्यात लागू करण्यात आल्या आहेत.**

(२) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) दि. १८ जुलै २०१८ च्या अधिसूचनेमध्ये सहाय्यक प्राध्यापक पद भरतीचे निकष सविस्तर दिले असून ते सर्वसमावेशक आहेत. **विद्यापीठ व महाविद्यालयीन पातळीवर किमान 90% जागा या कायमस्वरूपी भराव्यात व उर्वरित 10% जागा कंत्राटी पद्धतीने** भरून कंत्राटी प्राध्यापकांना किमान रु. ५७७०० इतके वेतन द्यावे असे बंधनकारक केले आहे.

(३) विद्यापीठ अनुदान आयोगाने तयार केलेले 'उमेदवार छाननी निकष' (Criteria for shortlisting of candidates for interview for the post of assistant professor in the universities) हे सर्वसमावेशक व व्यापक स्वरूपाचे आहेत. त्यामध्ये शैक्षणिक गुणवत्ता, अध्ययन, अध्यापन, मूल्यमापन, संशोधन, संशोधन प्रकाशने याचा समतोल साधला आहे. तसेच किती उमेदवार मुलाखतीसाठी पात्र करावयाचे (Number of candidates to be called for interview shall be decided by the concern Universities) त्याचे **सर्व अधिकार हे विद्यापीठांना देऊन विद्यापीठांची शैक्षणिक स्वायत्ता अबाधित राखली आहे.**

(४) यूजीसीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, विद्यापीठ/महाविद्यालयामध्ये जे शिक्षक पदव्युत्तर पदवी विभागाला/विषयाला शिकवतात त्यांनाच संशोधक मार्गदर्शक (Research Guide) म्हणून मान्यता दिल्याने Ph.D. पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थी संख्येवर मर्यादा आली आहे. नेट-सेट पास झाल्यानंतर नोकरीच्या शोधात असणारा शिक्षक संशोधन कधी करणार असा प्रश्न उपस्थित होत आहे. **तुटपुंज्या वेतनावर काम करणाऱ्या तासिका तत्वावरील शिक्षकाला संशोधनाचा खर्च परवडणार नाही.** त्यामुळे त्याला संशोधनापासून वंचित रहावे लागत आहे. परिणामी त्याचे गुणांकन कमी होणार आहे व त्याची मुलाखतीची संधी नाकारली जाणार आहे.

(५) नेट-सेट किंवा फक्त पीएच.डी. असणारे अनेक शिक्षक आपल्याला कायमस्वरूपी शिक्षकाची संधी मिळेल या आशेवर तुटपुंज्या वेतनावर काम करत आहेत. दि. ०६ ऑक्टोबर २०२५ चा शासन आदेश हा त्यांच्या १५ ते २० वर्षाच्या तासिका तत्वावरील अनुभवाला फक्त ५ गुण देणारा आहे. **नेट-सेट ही पदवी पीएच.डी. ला समकक्ष केली आहे परंतु गुणांकनामध्ये मात्र भेदभाव दिसून येतो.**

(६) शासन आदेशामध्ये Sci Finder, Web of Science आणि Scopus या जर्नलमध्ये शक्यतो विज्ञान, अभियांत्रिकी, संगणक, वैद्यक इत्यादी शाखेतील संशोधन पेपर प्रकाशित केले जातात. वरील जर्नलमध्ये पेपर प्रकाशित करण्यासाठी भाषा, सामाजिक शास्त्र, कला व वाणिज्य शाखेतील संशोधनासाठी संधी नाही. या जर्नलमध्ये संशोधन पेपर प्रकाशित करण्यासाठी फी द्यावी लागते. तात्पुरत्या तसेच तासिका तत्वावर काम करणाऱ्या उमेदवारांना या जर्नलची फी भरणे अशक्य आहे. तसेच या जर्नलमध्ये पेपर प्रकाशित करणे वेळखाऊ प्रक्रिया आहे. महाविद्यालयातील व **विद्यापीठातील कायम प्राध्यापकांना पदोन्नतीसाठी (CAS Promotion) लागणारे संशोधन पेपर हे Peer Review जर्नलमधील सुद्धा चालतात मग नवीन नियुक्तीसाठी Sci Finder, Web of Science** आणि Scopus IPR (Patents/Copyright/Trademarks/Designs etc.) **चा आग्रह कशासाठी?**

(७) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १६ जुलै २०२५ च्या सार्वजनिक सुचनेनुसार प्राध्यापक पदोन्नतीसाठी UGC Care list Journal मधील पेपरची अट रद्द करून Peer Review Journal मधील पेपर ग्राह्य धरण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने सहाय्यक प्राध्यापक भरती संदर्भात Sci Finder, Web of Science आणि Scopus या जर्नलमधील पेपर प्रकाशित करण्याची अट शिथिल करून Peer Reviewed, ISSN, ISBN जर्नलमधील संशोधन पेपर ग्राह्य धरावेत. प्राध्यापक नेमणुकीसाठी व पदोन्नतीसाठी अशा प्रकारचे संशोधन प्रकाशनासंदर्भात UGC चे धोरण हे संदिग्ध राहिलेले आहे. अनेक वेळा संशोधन पेपर संदर्भात ISBN, ISSN, Impact factor, Peer review, UGC approved, UGC Care listed Journal इत्यादी वेळोवेळी बदल UGC ने केलेले आहेत. **त्या त्या वेळच्या UGC च्या धोरणानुसार हे प्राध्यापक संशोधन पेपर प्रकाशित करत आलेले आहेत. अचानक या संदर्भात विशिष्ट संशोधन पत्रिकेतीलच संशोधन पेपर प्राध्यापक नेमणुकीसाठी गृहीत धरले जातील ही बाब अत्यंत अन्यायकारक** असून आतापर्यंत प्रकाशित झालेले संशोधन पेपर हे कमी दर्जाचे किंवा बिनकामाचे होते असे यातून सिद्ध करायचे आहे का?

(८) जे उमेदवार कायमस्वरूपी नोकरीत नाहीत त्यांना या नवीन निकषानुसार सहाय्यक प्राध्यापकाच्या मुलाखतीस पात्र होताना घालण्यात आलेले नवीन निकष जसे की, IPR मधील Patents, Copyright, Trademarks आणि Designs तयार करण्यासाठी आणि त्याला मान्यता घेण्यासाठी जास्त वेळ आणि पैशाची गरज असते. परंतु तासिका तत्वावरील काम करणाऱ्या प्राध्यापकांचे तुटपुंजे मानधन असल्यामुळे त्यांना आर्थिक अडचणी येतात. नुकतीच पात्रता प्राप्त केलेल्या किंवा काही वर्ष अनुभव असलेल्या उमेदवारांकडून पेटंट, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधन, राष्ट्रीय दर्जाच्या प्रकाशकाकडून ग्रंथ प्रकाशन, राज्य आणि राष्ट्रीय पुरस्काराची अपेक्षा करून ३ गुण त्याला देणे हे अन्यायकारक आहे. **सेवेत कायम नसल्यामुळे अनेक संशोधन संस्था तासिका तत्वावरील सहाय्यक प्राध्यापकांना संशोधन प्रकल्प करिता अनुदान देत नाहीत.**

(९) अनेक पुरस्कारांसाठी कायमसेवेची अट असते. त्यामुळे संशोधन व पुरस्कारासाठी ३ गुण या उमेदवारांना मिळणे केवळ अशक्य होऊन जाते. राज्यशासनाचे किंवा केंद्रशासनाचे Online अभ्यासक्रम तयार करण्याकरिता जी व्यावसायिक स्थिरता आणि पद असावे लागते त्याची वानवा असल्यामुळे MOOCs for SWAYAM, SWAYAM plus, NPTEL या पोर्टलवर अभ्यासक्रम तयार करणे, **हे निकष सहाय्यक प्राध्यापक पदासाठीचे अनेक उमेदवार हे पूर्ण करू शकत नाहीत.**

(१०) सहाय्यक प्राध्यापक पद भरतीचा दि. ०६ ऑक्टोबर, २०२५ चा शासन आदेश हा ग्रामीण, डोंगराळ व आदिवासी भागात अनेक वर्षे तासिका तत्वावर काम करणाऱ्या **सहाय्यक प्राध्यापकांना नोकरीची संधी नाकारणारा व संशोधन व मुलाखत याला जास्त महत्त्व देणारा हा शासन आदेश आहे.**

(११) भरती प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणणे म्हणजे कठोर निकष तयार करून पात्र उमेदवारांची संधी नाकारणे हे अपेक्षित नसून **"समान शैक्षणिक अर्हतेला समान संधी" हा निकष ठेऊन, निकोप स्पर्धेतून व पारदर्शक प्रक्रियेमधून उमेदवारांची निवड व्हावी.**

तरी हा शासन आदेश तातडीने रद्द करावा ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू
**प्रा.(डॉ.) प्रवीण रघुवंशी**
(सचिव - महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ, मुंबई)

Dr.Prashant Narnaware, IAS, Secretary to the Governor,
ई-मेल : secy.rb-mh@nic.in

*राज्यातील सार्वजनिक विद्यापीठामधील (अकृषि) अध्यापकांच्या भरती प्रक्रीयेमध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी कार्यपद्धती विहित करण्याबाबत*

# महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२५/ई-८६०४२१/विशि-१ मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२

**दिनांक : ६ ऑक्टोबर २०२५**

**वाचा : (१) भारताचे राजपत्र : असाधारण, भाग III-विभाग ४, यूजीसी नोटिफिकेशन दिनांक १८ जुलै २०१८**

**(२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण-२०१८/ प्र.क्र.५६/१८/विशि-१, दिनांक ८ मार्च २०१९**

(३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शुद्धीपत्र क्रमांक संकीर्ण-२०१८/ प्र.क्र.५६/१८/विशि-१, दिनांक १० मे २०१९

(४) उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२३०९/ प्र.क्र.१२८/विशि-१, दिनांक ५ मार्च, २०२४

(५) मा.राज्यपाल यांचे अवर सचिव (शिक्षण), राजभवन यांचे पत्र क्रमांक आरबी/जीइएन-२०२४/सीआर-९२८/इडीएन.५/१८२, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२५

(६) उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२५/ प्र.क्र.ई-८६०४२१/विशि-१, दि. २८ फेब्रुवारी २०२५

(७) शासन पत्र दि. ०७ जुलै, २०२५ व दि. ३१ जुलै, २०२५

(८) उप सचिव, राजभवन यांचे पत्र क्र.आरबी/जीइएन-२०२४/सीआर ९२८/इडीएन-५/७९५, दि. १८ सप्टेंबर, २०२५

### *प्रस्तावना*

उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थामधील अध्यापकांकरीता विद्यापीठ अनुदान आयोगाकडून शैक्षणिक अर्हता आणि अनुषंगिक बाबी विहित करण्यात येतात. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून दि. १८ जुलै, २०१८ च्या अधिसूचनेद्वारे उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांकरिता "Minimum qualifications for appointment of teachers and other academic staff in Universities and Colleges and Measures for the maintenance of standards in Higher Education" निश्चित करण्यात आली आहेत. **सदर अधिसुचनेतील तरतुदी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि. ८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयान्वये राज्यात लागू करण्यात आल्या आहेत.** दि. २८.०२.२०२५ च्या शासन निर्णयान्वये अध्यापकांची निवड प्रक्रिया राबविण्याबाबत कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. सदर निवड प्रक्रिया अधिक पारदर्शक, निष्पक्ष आणि संतुलित व्हावी यासाठी मा.कुलपती तथा राज्यपाल महोदयांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेले निर्देश विचारात घेऊन सुधारित कार्यपद्धती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

### *शासननिर्णय*

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील (अकृषि) अध्यापकांच्या निवड प्रक्रियेसाठी शासन निर्णय दि. २८.०२.२०२५ अन्वये विहित केलेल्या कार्यपद्धतीत सुधारणा करून सोबतच्या **परिशिष्ट-अ** मध्ये नमूद केलेली सुधारित कार्यपद्धती विहित करण्यात येत आहे.

२. वरील कार्यपद्धतीनुसार राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील (अकृषि) सध्या सुरू असलेली अध्यापकांनी निवडप्रक्रिया पूर्ण करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. तसेच भविष्यात होणाऱ्या राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील अध्यापकांच्या निवड प्रक्रियेकरता या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५१००६१८३२२६८४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(प्रताप पां.लुबाळ)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**परिशिष्ट-अ**

(शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२५/ई-८६०४२१/विशि-१ दि. ०६ ऑक्टोबर २०२५ सोबतचे सहपत्र)

## Revised procedure for the Recruitment of Teachers in State Public Universities (NonAgricultural)

The following procedure is prepared to make the selection process more transparent, objective and effective:

1. The weightage for the Academic, Teaching and Research Credentials (ATR) as 75% Weightage and for the Interview Performance as 25% Weightage for preparing the Merit List of Candidates.

2. The candidates scoring above 50 marks in the number ATR will be held as eligible for interview. The universities will decide the ratio of the candidates to be called for interview per vacant seat to be filled in for different cadres viz. Assistant Professors/ Associate Professors/Professors.

**3. Assistant Professor :-**

Quantification of Academic, Teaching and Research Credentials of Candidates (75% Weightage) will be as follows:-

**A. Academic Records (Max. Marks 55)**

The score and weightage for Academic Records of UG, PG, M. Phil. and Ph.D. will be based on the type of Degree Awarding University. If the candidate has been awarded the Degree by the Institutes of National Importance (IITs, NITs, IISER, IIM etc) or Foreign Universities having Quacquarelli Symonds (QS)/ Times Higher Education (THE) / ARWU of the Shanghai World University Rankings within 200, then highest marks shall be given. In case of Central/State Public Universities (including State/ Central Deemed to be Universities) or equivalent holding NIRF Rank within 100 or Foreign Universities having QS/ THE/ARWU of the Shanghai World University Rankings between 200-500, the score shall be given as 90% of the Maximum. For other Central/State Public Universities (including State/ Central Deemed to be Universities) or equivalent, the score shall be given 80% of maximum. For rest of the UGC approved Universities, the score to be given will be 60% of the maximum marks.

**a. Score for Marks obtained at UG and PG Degree Examinations**

i. Graduation (Max. Marks 11):

80% & above = 11 marks, 60% to less than 80% =09 marks, 55% to less than 60% =7 marks, 45% to less than 55%= 4 marks

ii. Post-graduation (Max. Marks 18):

80% & above = 18 marks, 60% to less than 80%=16 marks, 55% (50% in case of SC/ST/OBC-non-creamy layer)/PWD to less than 60% = 14 marks

**b. Score for M.Phil. and Ph.D. (Max. Marks 20)**

i. M.Phil.: 60% & above = 5 marks, 55% to less than 60% = 03 marks

ii. Ph.D.: 20 marks

M.Phil.+ Ph. D. = maximum 20 marks

**c. Score for JRF/NET/SET (Max. Marks 6)**

NET with JRF: 06 marks; NET: 04 marks; SET: 03 marks

JRF/NET/SET = maximum 06 marks

**B. Teaching Experience (Max. Marks 5):**

Scores for approved teaching experience (as

approved by the University /Parent body) / Postdoctoral experience in Institutes of National Importance or from foreign Universities within top 500 QS/ THE/ARWU of the Shanghai World University Rankings shall be 1 mark per year. However, if the period of teaching/Post-doctoral experience is less than one year then the marks shall be reduced proportionately.

**C. Assessment of Research Aptitude and Innovation Skills (Max. Marks 15)**

**a. Research Publications (Max. Marks: 6)**

In case of award of Marks under Research Publications, only Indexed Journal lists of SciFinder, Web of Science and Scopus shall be considered. Score for Research Publications enlisted under SciFinder, Web of Science or Scopus databases shall be 1 per Research Paper for single author Publications. In case of Multiple Authors, the principal author (first author or author for correspondence) shall get 50% Marks and for all other authors, rest of the 50% marks shall be distributed proportionally. No score shall be given to other publications.

**b. Books Authored/ IPR generated (Max. 6 Marks)**

**i. Total Number of books and chapters in edited volumes published by Reputed (National/ International) Publisher (with ISBN):**

2 marks per authored reference book. 1 Mark per Edited Book/ chapters in edited volume/ Translated Book.

**ii. IPR (Patents / Copyright/ Trademarks/ Designs etc.) granted/ awarded**

2 marks per IPR granted Books Authored+ IPR generated: Max. 6 Marks

**c. Awards (Max. 3 Marks):**

International/National Level (Awards given by International Organizations/Government of India/ Government of India recognized National Level Bodies): 03

State Level (Awards given by State Government): 02

International/National/ State Level Awards: Max. 3 Marks

Thus the overall weightage of Academic, Teaching and Research Credentials for the position of Assistant Professor (through 3- A to C) shall be 75%.

**4. Associate Professor :-**

Quantification of Academic, Teaching and Research Credentials of Candidates for the position of Associate Professor (75% Weightage)

**A. Academic Records (Max. Marks 45)**

The Max. Score under Academic Records for UG, PG, M. Phil. and Ph.D. should be graded as per the type of Degree Awarding University. If the candidate has been awarded the Degree by the Institutes of National Importance (IITs, NITs, IISER, IIM etc) or Foreign Universities having Quacquarelli Symonds (QS)/ Times Higher Education (THE) / ARWU of the Shanghai World University Rankings within 200, then highest marks shall be given. In case of Central/State Public Universities (including State/ Central Deemed to be Universities) or equivalent holding NIRF Rank within 100 or Foreign Universities having QS/ THE/ARWU of the Shanghai World University Rankings between 200-500, the score shall be given as 90% of the Maximum. For other Central/State Public Universities (including State/ Central Deemed to be Universities) or equivalent, the score shall be given 80% of Maximum. For rest of the UGC approved Universities, the score shall be allotted to 60% of the highest marks.

**a. Score for Marks obtained at UG and PG Degree Examinations**

**i. Graduation (Max. Marks 8):**

80% & above = 08 marks, 60% to less than 80% =06 marks, 55% to less than 60% =05 marks, 45% to less than 55%= 03 marks

**ii. Post-graduation (Max. Marks 15):**

80% & above = 15 marks, 60% to less than 80%=13 marks, 55% (50% in case of SC/ST/OBC-non-creamy layer)/PWD to less than 60% = 11 marks

**b. Score for M.Phil. and Ph.D. (Max. Marks 18)**

i. M.Phil.: 60% & above = 04 marks, 55% to less than 60% = 03 marks

ii. Ph.D.: 18 marks

M.Phil.+ Ph. D. = maximum 18 marks

**c. Score for JRF/NET/SET (Max. Marks 4)**

NET with JRF: 04 marks; NET: 03 marks; SET: 02 marks

JRF/NET/SET = maximum 04 marks

**B. Teaching Experience (Max. Marks 5):**

The additional experience in years over and above the minimum years of approved experience (as approved by the University /Parent body and minimum years specified/ prescribed for the position of Associate Professor) of teaching and / or research in an academic/ research position equivalent to that of Assistant Professor in a University, College or Accredited Research Institution/Industry, shall be used for the calculation of Score for the Teaching Experience. The Score for additional approved experience shall be 1 mark per year.

**C. Assessment of Research Aptitude and Innovation Skills (Max. Marks 25)**

**a. Research Publications (Max. Marks: 6)**

In case of award of Marks under Research Publications, only Indexed Journal lists of SciFinder, Web of Science and Scopus shall be considered. Score for Research Publications enlisted under SciFinder, Web of Science or Scopus databases shall be 1 per Research Paper for single author Publications. In case of Multiple Authors, the principal author (first author or author for correspondence) shall get 50% Marks and for all other authors, rest of the 50% marks shall be distributed proportionally. No score shall be given to other publications.

The additional number of research publications, over and above minimum research publications specified/ prescribed for Associate Professor, shall be considered for the calculations of Publication Score.

**b. Books Authored/MOOCs developed/ IPR generated (Max. 8 Marks)**

**i. Total Number of books and chapters in edited volumes published by Reputed (National/ International) Publisher (with ISBN):-** 2 marks per authored reference book 1 Mark per Edited Book/ chapters in edited volume/Translated Book

**ii. Development of MOOCs for SWAYAM, SWAYAM plus, NPTEL,** महाज्ञानदीप :- 2 marks per MOOC developed

**iii. IPR (Patents / Copyright/ Trademarks/ Designs etc.) granted/ awarded:-** 2 marks per IPR granted Books Authored+/MOOCs developed+ IPR generated: Max. 8 Marks

**c. Awards (Max. 3 Marks):**

International/National Level (Awards given by International Organizations/Government of India/ Government of India recognized National Level Bodies): 03

State Level (Awards given by State Government):

02

International/National/ State Level Awards: Max. 3 Marks

**d. Ph.D. Guidance (No of Ph. D.s awarded under his/ her supervision as Guide) (Max. 3 Marks):-** 1 mark per Ph.D. award

**e. Cumulative Funds generated through R & D Projects sanctioned as PI by different Government Funding Agencies and Consultancy through Industrial/Professional Projects (Max. 5 Mark)**

INR upto 2 lakh = 1/2 mark

>INR 2 lakh and <= INR 5 lakhs = 1 mark

>INR 5 lakhs and <=INR 10 lakhs = 2 mark

>INR 10 lakhs and < =INR 25 lakhs = 3 marks

>INR 25 lakhs and <=INR 50 lakhs = 4 marks

>INR 50 lakhs = 5 marks

Thus the overall weightage of Academic, Teaching and Research Credentials (through 4-A to C) for the position of Associate Professor shall be 75%.

**5. Professor :-**

Quantification of Academic, Teaching and Research Credentials of Candidates for the position of Professor (75% Weightage)

**A. Academic Records (Max. Marks 40)**

The Max. Score under Academic Records for UG, PG, M. Phil. and Ph.D. should be graded as per the type of Degree Awarding University. If the candidate has been awarded the Degree by the Institutes of National Importance (IITs, NITs, IISER, IIM etc) or Foreign Universities having Quacquarelli Symonds (QS)/ Times Higher Education (THE) / ARWU of the Shanghai World University Rankings within 200, then highest marks shall be given. In case of Central/State Public Universities (including State/ Central Deemed to be Universities) or equivalent holding NIRF Rank within 100 or Foreign Universities having QS/ THE/ARWU of the Shanghai World University Rankings between 200-500, the score shall be given as 90% of the Maximum. For other Central/State Public Universities (including State/ Central Deemed to be Universities) or equivalent, the score shall be given 80% of Maximum. For rest of the UGC approved Universities, the score shall be allotted to 60% of

Registered Under Trade Union Act 1926 No. by II-8162 of 1985

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS ORGANIZATION (MFUCTO)**

**University Club House, B-Road, Charchgate, Mumbai-400 020**

PRESIDENT
**Prof. Dr. S. P. Lawande**
Email : splawande@gmail.com
Mob.- 09422228174

GENERAL SECRETARY
**Prof. Dr. P. B. Raghuwanshi**
Email : pbraghuwanshi@gmail.com
Mob.- 09422155603

**Ref.No. : MFUCTO/EC-08/25 : Date : 17.11.2025**

**मा.प्रधान सचिव,**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०००३२

**विषय** : महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्रमोशनसाठी व भरतीसाठी आचारसंहिता लागू न करणेबाबत.

**संदर्भ** : (१) युएसजी/२०१९/४८३२/विशि-४/दि.०२ ऑगस्ट १९९९

(२) शासन निर्णय ०८ मार्च २०१९ व १० मे २०१९

(३) युएनआय/अध्यापक पदोन्नती/२०२४/विशी-१/२५१०/दि.२४ एप्रिल २०२४

(४) रानिआ/२०२५/निका/न.प./प्रा.क्र.१४/का.६/दि.०४ नोव्हेंबर २०२५

(१) उपरोक्त विषय संदर्भ क्र. ४ नुसार, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आचार संहिता लागू केली आहे. ही आचारसंहिता ४ नोव्हेंबर २०२५ पासून संबंधित नगरपालिका क्षेत्रामध्ये लागू झाली आहे. ती निवडणुकीचे निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहणार आहे.

(२) संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये सुद्धा शासनाने "शिक्षकांची पदे ही निवड समितीच्या माध्यमातून व विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून भरली जातात. विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता ही पदे भरण्याची कार्यवाही स्थगित करणे उचित होणार नसल्याने, आचारसंहितेच्या काळातील ही पदे भरण्यास शासनाची हरकत नाही असे कळविले आहे.

(३) शासन निर्णय ०८ मार्च २०१९ मधील 7.3(v) नुसार "for the promotion under CAS the applicant teacher must be on the role and in active service of the Universities/Colleges on the date of consideration by the selection committee." अशी तरतूद आहे.

(४) शासन निर्णय १० मे, २०१९ नुसार, निवड समितीचा बैठक दिनांक, हाच संबंधित अध्यापकास निवड समितीने शिफारस केल्यास, पदोन्नतीचा दिनांक म्हणून मंजूर केला जातो. आदर्श आचारसंहिता कालावधी दरम्यान कॅस निवड समितीची बैठक न झाल्यास पात्र उमेदवारांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसार होणार आहे.

(५) करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम अंतर्गत पदोन्नतीची प्रक्रिया (Promotion Process) ही किमान ३ महिने अगोदर सुरू झाली आहे. त्यामध्ये पात्र शिक्षकाचा महाविद्यालयाकडे अर्ज, प्रस्ताव, परिपूर्ण प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठविणे या महाविद्यालयीन पातळीवरील प्रक्रियेचा (Process) समावेश होतो. बहुतांश महाविद्यालय पातळीवर ही प्रक्रिया पूर्ण झाली असून, प्रस्तावाची विद्यापीठाकडून छाननी होऊन, मुलाखतीची/छाननी समितीसमोर उपस्थित राहण्याची तयारी सुद्धा विद्यापीठ/महाविद्यालयाकडून झाली आहे.

(६) संदर्भ क्र. ४ मधील आचारसंहिता तरतूद पुढीलप्रमाणे आहे :- "६. निवडणुकीची आचारसंहिता निवडणूक कार्यक्रम निर्गमित केलेल्या वेळेपासून झाली असून ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. वरील आचारसंहिता सार्वत्रिक निवडणुकीकरिता नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या संपूर्ण क्षेत्रात लागू राहतील. उपरोक्त क्षेत्रातील **मतदारांवर प्रलोभन देणारी कोणतीही कृती / घोषणा** कोणत्याही मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक किंवा इतर पदाधिकाऱ्यांना इतरत्र सुद्धा करता येणार नाही."

(७) उपरोक्त संदर्भ क्र. ३ नुसार "विद्यापीठे आणि महाविद्यालयाच्या स्तरावरील CAS अंतर्गत पदोन्नती प्रक्रिया व निवड समितीची बैठक आदर्श आचारसंहिता कालावधीत आयोजित करण्यात यावी व बैठकीचा अहवाल निवड समिती अध्यक्ष/सदस्य सचिव यांच्या स्वाक्षरीत असलेल्या सिलबंद लिफाफ्यात आदर्श आचारसंहिता पूर्णतः संपेपर्यंत समिती अध्यक्षांच्या ताब्यात ठेवण्यात यावा असे निर्देश देण्यासंदर्भात मा.संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी आपणास कळविले आहे."

(८) उपरोक्त सर्व संदर्भीय पत्रांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, **महाविद्यालयीन पातळीवर शिक्षक भरती आणि शिक्षकांची पदोन्नती या बाबी प्रदीर्घ प्रक्रियेचा भाग असल्याने त्यामध्ये आचारसंहितेच्या अनुषंगाने मतदारांना प्रलोभन दाखवण्याचा संबंध येत नाही.**

तरी, महाविद्यालयीन पातळीवर शिक्षक भरती आणि शिक्षकांची पदोन्नती या बाबी प्रदीर्घ प्रक्रियेचा भाग असल्याने त्यामध्ये आचारसंहितेच्या अनुषंगाने स्थगित केलेली प्रमोशन व प्राध्यापक भरती प्रक्रिया तात्काळ चालू करावी, ही विनंती. कळावे,

आपला विश्वासू
**प्रा.(डॉ.) प्रवीण रघुवंशी**
(सचिव - महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ, मुंबई)

the highest marks.

**a. Score for Marks obtained at UG and PG Degree Examinations**

**i. Graduation (Max. Marks 7):**

80% & above = 07 marks, 60% to less than 80% =05 marks, 55% to less than 60% =04 marks, 45% to less than 55%= 02 marks

**ii. Post-graduation (Max. Marks 13):**

80% & above = 13 marks, 60% to less than 80%=11 marks, 55% (50% in case of SC/ST/OBC-non-creamy layer)/PWD to less than 60% = 9 marks

**b. Score for M.Phil. and Ph.D. (Max. Marks 17)**

i. M.Phil.: 60% & above = 04 marks, 55% to less than 60% = 03 marks

ii. Ph.D.: 17 marks

M.Phil.+ Ph. D. = maximum 17 marks

**c. Score for JRF/NET/SET (Max. Marks 3)**

NET with JRF: 03 marks; NET: 02 marks; SET: 01 marks

JRF/NET/SET = maximum 03 marks

**B. Teaching Experience (Max. Marks 5):**

The additional experience in years over and above the minimum years of approved experience (as approved by the University /Parent body and minimum years specified/ prescribed for the position of Professor) of teaching in university/ college as Assistant Professor/Associate Professor/ Professor, and / or research experience at equivalent level at the University/National Level Institutions, shall be used for the calculation of Score for the Teaching Experience. The Score for additional approved experience shall be 1 mark per year.

**C. Assessment of Research Aptitude and Innovation Skills (Max. Marks 30)**

**a. Research Publications (Max. Marks: 6)**

In case of award of Marks under Research Publications, only Indexed Journal lists of SciFinder, Web of Science and Scopus shall be considered. Score for Research Publications enlisted under SciFinder, Web of Science or Scopus databases shall be 1 per Research Paper for single author Publications. In case of Multiple Authors, the principal author (first author or author for correspondence) shall get 50% Marks and for all other authors, rest of the 50% marks shall be distributed proportionally. No score shall be given to other publications.

The additional number of research publications, over and above minimum research publications specified/ prescribed for Professor, shall be considered for the calculations of Publication Score.

**b. Books Authored/MOOCs developed/ IPR generated (Max. 8 Marks)**

**i. Total Number of books and chapters in edited volumes published by Reputed (National/ International) Publisher (with ISBN):**

2 marks per authored reference book. 1 Mark per Edited Book/ chapters in edited volume/ Translated Book

**ii. Development of MOOCs for SWAYAM, SWAYAM plus, NPTEL, MahaDNYANDEEP:-**

2 marks per MOOC developed

**iii. IPR (Patents / Copyright/ Trademarks/ Designs etc.) granted/ awarded:-**

2 marks per IPR granted Books Authored+MOOCs developed+ IPR generated: Max. 8 Marks

**c. Awards (Max. 5 Marks):**

International/National Level (Awards given by International Organizations/Government of India/ Government of India recognized National Level Bodies): 03

State Level (Awards given by State Government): 02

International/National/ State Level Awards: Max. 3 Marks

**d. Ph.D. Guidance (No of Ph. D.s awarded under his/ her supervision as Guide) (Max. 5 Marks)**

1 mark per Ph.D. award

**e. Cumulative Funds generated through R & D Projects sanctioned as PI by different Government Funding Agencies and Consultancy through Industrial/Professional Projects (Max. 6 Mark)**

INR upto 5 lakh = 1/2 mark

>INR 5 lakhs and <=INR 10 lakhs = 1 mark

>INR 10 lakhs and < =INR 25 lakhs = 2 marks

>INR 25 lakhs and <=INR 50 lakhs = 3 marks

>INR 50 lakhs and 75<=INR lakhs = 4 marks

> INR 75 lakhs to < =INR 1 Crore : 5 marks

> INR 1 Crore : 6 marks

Thus the overall weightage of Academic, Teaching and Research Credentials for the position of Professor (through 5-A to C) shall be 75%.

**6. Interview:-**

Assessment of Shortlisted Candidates through Interview (25% weightage) for Assistant Professors/ Associate Professors/ Professors

The Marking Scheme for the distribution of Scores for different heads of Interview Performance may be based on following parameters:-

i. Depth of Domain Subject knowledge and understanding of recent developments in the field (15 marks)

ii. Language Proficiency and ICT Skills for use of modern Teaching-Learning Aids (5 marks)

iii. Logical reasoning and Future Plan (Teaching, Research and Extension) (3 marks)

iv. Assessment of Outreach/ Extension and Co-curricular Activities and Knowledge of NEP Policy of Shortlisted Candidates (2 marks)

Assessment of first two parameters shall be based on the presentation made by the candidate at the time of interview.

The distribution different heads of Interview Performance is illustrative and individual University may decide the distribution of Marking as per their requirements.

The average score awarded by all selection committee members must be used to finalize the interview scores.

Strict confidentiality of the proceedings of the Interview shall be observed. Video Recording of the proceedings of the Selection Committee meeting shall be carried and the same shall be sealed with the signatures of all Committee Members present immediately after the process is complete. Such record shall be treated as confidential and shall be made available only if required by the court of law.

**7. Preparation of the Merit List:-**

The merit list shall be prepared based on the combined score of Academic, Teaching and Research Credentials (75% Weightage) and Interview (25% weightage) [Thus total out of 100].

The Final Results of the Entire Selection Process shall be announced within a minimum of week after the completion of the entire Cadre-wise Interview Process for Assistant Professors/ Associate Professors/ Professors.

*********

## प्रा.डॉ.आर.के.चव्हाण

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) व सहकार्यवाह, एमफुक्टो


**दिनांक : २१ डिसेंबर, २०२४**

प्रति,

आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख (भाऊ)

माजी विधानपरिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष

**विषय :** 'सुधारित निवृत्तिवेतन योजना निषेध-विशेषांक' शब्दबद्ध केल्याबद्दल मनःपूर्वक आभार...

आदरणीय भाऊ, सस्नेह नमस्कार,

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा 'सुधारित निवृत्तिवेतन योजना निषेध-विशेषांक' हा विशेषांक महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या निर्णयानुसार व सर्व घटक संघटनांच्या वतीने प्रकाशित करण्यात आला आहे. या विशेषांकामध्ये आपण शब्दबद्ध केलेले एकूण ४ लेख वाचनात आले.

(१) कायमस्वरूपी १० टक्के वेतन कपात लादणारी सुधारित निवृत्तीवेतन योजना

(२) जुन्या पेन्शन योजनेचा प्रश्न हा सरळ सरळ शासन स्वामीत्वाधिकारित धनाच्या वहन वळणाचा प्रश्न आहे

(३) भांडवली बाजारातील खेळाडू एका बाजूला व दुसऱ्या बाजूला आपले स्वतःचे कर्मचारी व शिक्षक

(४) जुनी पेन्शन योजना, नवीन पेन्शन योजना, आता सुधारित नवीन पेन्शन योजना

या विशेषांकामध्ये आपण शब्दबद्ध केलेल्या एकूण २२५ परिच्छेदांबद्दल आपले मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यासाठी आणि जुन्या पेन्शनसाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांच्या कृतज्ञ भावना आपल्यापर्यंत पोहचविण्यासाठी, आपणाशी या पत्राच्या माध्यमातून संवाद साधत आहे.

मी २००८ साली महाविद्यालयीन शिक्षक म्हणून व्यावसायिक जीवनात प्रवेश केला. त्यामुळे हा संवाद जुन्या पेन्शन योजनेसाठी संघर्ष करणाऱ्या माझ्या स्वतःचा तर आहेच, परंतु जुन्या पेन्शनसाठी संघर्ष करणाऱ्या समस्त शिलेदारांचा प्रतिनिधी म्हणून सुद्धा आहे. **हा फक्त औपचारिक संवाद नसून 'ये हृदयीचे ते हृदयी घातले' या भावनेने साधत आहे.**

या ४ लेखांमध्ये आपण ब्रिटिशांच्या काळातील पेन्शन योजनेपासून ते २०२४ मध्ये विधानसभेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन जाहीर झालेल्या सुधारित निवृत्तीवेतन योजनेचे संपूर्ण व सखोल विवेचन केलेले आहे. दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर व्यावसायिक जीवनामध्ये आलेल्या, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व शासकीय-निमशासकीय कर्मचारी, यांना हा विशेषांक मार्गदर्शक ठरणार आहे. सध्या सुरू असलेल्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीमध्ये (NPS) कर्मचाऱ्यांच्या कडून १० टक्के वेतन कपात ही कायमस्वरूपी केली जात आहे. महाविद्यालयीन पातळीवरील परिस्थिती पाहता डी.सी.पी.एस. ते एन.पी.एस. ते यु.पी.एस. हा प्रवास होत असताना डी.सी.पी.एस. मध्ये जमा झालेली रक्कम, त्याचे व्याज व डीसीपीएस खाते बंद करताना **त्या खात्याचा हिशेब अद्यापही महाराष्ट्रातील अनेक प्राध्यापकांना मिळालेला नाही. ही बाब लक्षात घेता नव्या पेन्शन योजनेच्या बाबतीत सुद्धा शासन किती गंभीर आहे हे लक्षात येते.**

ब्रिटिशांनी सुद्धा त्यांच्या काळात त्यांच्या कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती नंतरची काळजी घेतलेली होती. इंडियन पेन्शन ॲक्ट, १८६७ मध्ये सुद्धा पेन्शनसाठी कर्मचाऱ्यांकडून वेतन कपात होत नव्हती. जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या संदर्भात राज्यातील विविध आस्थापनावर असलेल्या कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन "VOTE FOR OPS" हे राबविलेले अभियान उल्लेखनीय होते. **या अभियानाचे यश आज जरी प्रत्यक्षदर्शी नसले तरी भविष्यामध्ये ते दृष्टीक्षेपात येईल** आणि स्वतःला जुनी पेन्शन लागू करणारे राज्यकर्ते आपल्या कर्मचाऱ्यांना सुद्धा जुनी पेन्शन योजना लागू करतील. ही लढाई आंदोलनाच्या माध्यमातून नक्की सुटेल. तशी उदाहरणे राजस्थान, पंजाब, छत्तीसगड, हिमाचल, झारखंड व सिक्कीम या राज्यांच्या संदर्भात पाहावयास मिळतात.

महाराष्ट्रातील शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाची नोंद शासन दरबारी झाली नाही असे नाही. ऑक्टोबर २०२४ ची विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्र शासनाने केंद्राचा कित्ता गिरवत कायदा न करता घाईघाईने मतपेटीवर डोळा ठेवून दिनांक २०.०९.२०२४ रोजी युनिफाईड पेन्शन स्कीम (यू.पी.एस.) संदर्भात काढलेला शासन निर्णय कर्मचाऱ्यांची घोर निराशा करणारा ठरला. चौथ्या वेतन आयोगाचा प्रदीर्घ संघर्ष केल्यानंतर मिळालेली जुनी पेन्शन, सहाव्या वेतन आयोगात पूर्णपणे गमवावी लागली. **१ नोव्हेंबर २००५ नंतर मात्र 'पूर्वी निवृत्त झालेले व आता निवृत्त होणारे' असा भेदभाव करणारी व्यवस्था तयार झाली.**

'पूर्वीचे व आताचे' हा फरक होत असताना, सन २००५ पूर्वी जाहिरात आलेले, न्यायालयीन अधिकारी, घटनात्मक पद धारक, संरक्षण खात्यातील अधिकारी व सैनिक यांना जुनीच पेन्शन योजना लागू केली आहे. **हा भेदभाव करताना राज्यकर्त्यांना संविधानाच्या अनुच्छेद १४ चा विसर पडला ही वस्तुस्थिती आहे.**

नवीन पेन्शन योजना सुरू करताना, कर्मचाऱ्यांची १०% वेतन कपात व १४% शासन हिस्सा आता तो १८.५% होईल, शासनाने भांडवलदारांचा विचार केलेला दिसतो. भांडवलदारांना सामान्य जनतेच्या करातून मिळणारा पैसा मिळवून देणे व त्यांच्याकडून मिळणाऱ्या देणग्यांच्या आधारे आपला पक्ष व सत्ता यासाठी कसा उपयोग करता येईल याची अतिशय सखोल चर्चा तुमच्या लेखनात आली आहे. यापुढील काळात जेव्हा हा विषय न्यायालयात जाईल त्यावेळी याचिका करताना **संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना व या चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना हा विशेष संदर्भ साधन म्हणून उपयोग होईल.**

काही राजकीय पक्षांनी याबाबत घेतलेली भूमिका नक्कीच कर्मचाऱ्यांच्या हिताची आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार गट, यांनी महाविकास आघाडी व स्वतःच्या पक्षाच्या जाहीरनाम्यात सुद्धा जुनी पेन्शन योजना लागू करू असे आश्वासित केले आहे. मला वाटते की, हे सुद्धा जुन्या पेन्शन संदर्भातील उभ्या केलेल्या लढाईचे यश आहे. सत्ता कधीच अमरपट्टा घेऊन येत नाही. **त्यामुळे आज जरी सत्ताधाऱ्यांना या विषयाचे महत्त्व वाटत नसले तरी भविष्यात त्यांचे मत परिवर्तन होणार नाही असे म्हणता येणार नाही.**

ज्या संघटना राज्य पातळीवर एकत्र येऊन फक्त जुन्या पेन्शनसाठी आंदोलन करतील त्यामध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ सहभागी असेल अशी महासंघाची भूमिका आहे. राजस्थान सरकारने जेव्हा जुनी पेन्शन योजना लागू केली तेव्हा एमफुक्टोचे अध्यक्ष डॉ.एस.पी.लवांडे सर व कार्यवाह डॉ.प्रवीण रघुवंशी सर यांनी २४ फेब्रुवारी २०२२ रोजी पत्र काढून या घोषणेचे स्वागत केले आहे. तसे एमफुक्टो पदाधिकाऱ्यांनी ज्या ज्या ठिकाणी जुन्या पेन्शन योजनेसाठी आंदोलने होतील त्या ठिकाणी स्वतः भेट देऊन एमफुक्टो ची भूमिका सांगून पाठिंबा व्यक्त केला व सक्रीय सहभाग घेतला आहे.

नवीन पेन्शन योजनेमध्ये कर्मचाऱ्यांची रक्कम गुंतवण्यासाठी जे मध्यस्थ नेमले आहेत ते आणि ज्या कंपन्यांमध्ये हे पैसे गुंतवले जाणार आहेत त्या कंपन्यासंदर्भात खात्री देण्याचे धाडस आजपर्यंत शासनाला झाले नाही. शेअर बाजारावर आधारित कंपन्यांचा इतिहास पाहिल्यास काही उदाहरणे व घोटाळे आपल्यासमोर आहेत. श्री.हरिदास मुंदडा समभाग घोटाळा, श्री.हर्षद मेहता समभाग घोटाळा, श्री.केतन पारिख समभाग घोटाळा, या घोटाळ्यांनी अनेक ठेवीदारांना व गुंतवणूकदारांना मरणयातना दिल्या. काही गुंतवणूकदारांनी आपली जीवन यात्रा संपवली व काही बँका सुद्धा बुडाल्या. हा इतिहास डोळ्यासमोर असताना कर्मचाऱ्यांचे १०% व शासनाचे म्हणजेच सामान्य जनतेच्या करातून गोळा केलेले १४%, ही रक्कम शेअर बाजारात गुंतवण्याचे धाडस शासन का करीत आहे? याचे उत्तर एकच आहे की, **ही व्यवस्था आता भांडवलदारांच्या हिताची झाली असून सामान्य नोकरदारांना महत्त्व न देणारी व मतदारांना गृहीत धरणारी झाली आहे.**

हिमाचल प्रदेश मध्ये जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी कसे नियोजन करण्यात आले याचा १० कलमी कार्यक्रम मार्गदर्शक आहे. महाराष्ट्रातील संघटनांना तो नक्कीच उपयोगाचा आहे. आम जनतेच्या समोर हा प्रश्न नेऊन या प्रश्नाप्रती त्यांचा सहभाग व पाठिंबा मिळविणे हे काम तसे जिकीरीचे आहे. कारण आजची सामाजिक परिस्थिती पाहता, कर्मचाऱ्यांच्या प्रति सामाजिक सहानुभूती फारच कमी झाली आहे. त्याला अनेक कारणे आहेत. असे असले तरीही त्यासाठी सभा, बैठका, चर्चा, संमेलने इ.च्या माध्यमातून संघटनात्मक व सामाजिक बांधिलकी करण्याशिवाय पर्याय नाही. दिनांक १२ डिसेंबर २०२३ रोजी, नागपूर येथील भव्य मोर्चा ही सर्व संघटनांच्या बांधणीची फलश्रुती होती. या मोर्चामध्ये **महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष डॉ.एस.पी.लवांडे सर व सेक्रेटरी प्रा.डॉ.प्रवीण रघुवंशी सर यांनी सहभाग घेऊन पाठिंबा दिला. तसेच राज्यभरातून हजारो प्राध्यापक या मोर्चामध्ये सहभागी झाले होते.**

माहितीच्या अधिकारात मिळालेली माहिती, राष्ट्रीय पेन्शन प्रणाली (NPS) मधून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती दर्शवते. एमपीएस मध्ये सेवानिवृत्त झालेल्या २७०१ व्यक्तीपैकी २११८ व्यक्तींचे तपशील माहितीच्या अधिकारात अधिकृतपणे मिळविण्यात आलेले आहेत. त्यामध्ये १२ व्यक्तींना पाचशे रुपये पेक्षा कमी निवृत्तीवेतन व निर्मला शर्मा यांच्या वाट्याला तर फक्त १४८.१७ रूपये पेन्शन आली आहे. एन.पी.एस. चा शेवट काय होणार आहे याचे हे महत्त्वाचे उदाहरण आहे. सेवेत असताना चांगल्या पगारामुळे 'आहे रे' (HAVES) गटात जगणारा लोकसेवक सेवानिवृत्तीनंतरचे वेतन पाहता 'नाही रे' (HAVE NOT) गटात जाणार हा केवढा मोठा बदल त्याला या पेन्शन योजनेमुळे सहन करावा लागणार आहे. **लाडकी बहीण योजनेच्या ३०% रक्कम सुद्धा ३० वर्षे नोकरी करणाऱ्या लोकसेवकांना मिळत नाही ही वस्तुस्थिती या**

**माहितीतून स्पष्ट होते.**

'अक्षरनामा' मध्ये अर्थकारण या सदरात श्री.हितेश पोद्दार यांनी कार्ल मार्क्सचा एक विचार मांडला आहे. कार्ल मार्क्सच्या मते, 'भांडवलशाहीच्या कुठल्याही देशातील विकास हा त्यातील पूर्वीच्या सर्व व्यवस्था मोडीत काढून होत असतो. म्हणजे जसे युरोपात झाले. तेथील भांडवलशाही ही सरंजामव्यवस्थेच्या अस्थिवर स्वार होऊन आधुनिक विचाराच्या आड उदयास येते.

आपल्या नागरिकांच्या सामाजिक व आर्थिक कल्याणाचे संरक्षण आणि प्रोत्साहन देणाऱ्या लोककल्याणकारी राज्याची संकल्पना राबविण्याची सुबुद्धी शासनकर्त्यांना मिळावी ही अपेक्षा करणे उचित ठरते. सन २००४ मध्ये पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू या दोन राज्यांनी नवीन पेन्शन योजना स्वीकारली नाही हे धाडस इतर राज्याने दाखविले नाही ही वस्तुस्थिती आहे.

**राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे प्रकरण हे गोरगरिबांचे तीर्थक्षेत्र आहे असे म्हणता येईल हे तुम्ही स्वतःच्या जीवन अनुभवासह मांडलेले आहे.** यातून आम्हाला तुमचे प्राथमिक शिक्षण, आर्थिक परिस्थिती, तुमचे शिक्षक, पत्रकारिता क्षेत्रामध्ये तुम्ही केलेली सुरुवात याविषयी माहिती मिळाली. मध्यप्रांत वराड मधील, मोर्शी तालुक्यातील, बेलोरा गाव. गावामधील 'जनपद' म्हणजे जिल्हा परिषद शाळा, बेलोरा शाळेत इंग्रजीसह शिक्षण घेताना भरावी लागणारी जादाची फी, मॉडेल स्कूल वर्धा, श्रद्धानंद बोर्डिंग, शिवाजी हायस्कूल ते विदर्भ महाविद्यालय, हा आपला शैक्षणिक प्रवास प्रेरणादायी आहे. विदर्भ महाविद्यालयात छात्र संघाचे अध्यक्ष, अमरावतीला 'दैनिक हिंदुस्थान'मध्ये स्व.श्री.बाळासाहेब मराठे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली तुमच्या लेखणीला आलेली विलक्षण धार आम्ही अनुभवत आहोत.

जेम्स रॉबिन्सन व डेरॉन असेमोलगू यांचे 'WHY NATIONS FAIL' हे पुस्तक नुकतेच वाचनात आले. या पुस्तकामध्ये 'शोषण करणाऱ्या संस्था' (Extracting Institutions), ही संकल्पना सविस्तरपणे मांडलेली आहे. 'Why Nation Fails Today' या तेरा क्रमांकाच्या प्रकरणामध्ये **"The most common reason why nations fails today is, because they have extractive institutions"** हा महत्त्वाचा संदर्भ आला आहे. 'Extractive institution' ची तीन महत्त्वाची वैशिष्ट्ये या नव्या पेन्शन योजनेला लागू होतात. (1) Limited access (2) Exploitation of economic system (3) Week rule of law.

या विशेषांकामध्ये आपण दिलेले संदर्भ हे फक्त जुनी पेन्शन व नवीन पेन्शन एवढ्या पुरतेच मर्यादित नसून देशाच्या जडणघडणीमध्ये सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर भांडवलशाही कशी प्रभावी ठरू शकते याचे विवेचन करणारे आहेत हे **'निवडणूक रोखे कायद्याचा धुमाकूळ, त्यातच दुखण्याचे मूळ'** यावरील विवेचनावरून स्पष्ट होते. **निवडणूक रोखे हे फक्त निवडणुकीचे अर्थकारण नसून शासन व्यवस्था प्रभावित करणारे व सत्ताधाऱ्यांचे राजकारण व विचारधारा प्रबळ करणारी व्यवस्था आहे हे आता सिद्ध झालेले आहे.**

**व्यावसायिक संघटनांनी राजकीय भूमिका घ्यायची किंवा नाही?** यावाबत आपण केलेले मार्गदर्शन कर्मचाऱ्यांना दिशा देणारे आहे. व्यावसायिक संघटना या राजकीय पक्षांच्या बांधिलकी स्वीकारणाऱ्या असू नयेत. हे जरी खरे असले तरी आपल्या व्यावसायिक जीवनावर आघात करणाऱ्या राजकीय पक्षाच्या विरोधात व व्यावसायिक आघात परतवून लावण्यासाठी संघटनेच्या पाठीशी ठाम असणाऱ्या राजकीय पक्षाला पाठिंबा देण्याचे धाडस दाखवण्यात आम्हाला कमी पडून चालणार नाही. ही वस्तुस्थिती आहे.

राजश्री छत्रपती शाहू महाराज व बडोद्याचे सयाजीराव गायकवाड यांनी लोकहितासाठी संस्थांच्या गंगाजळीचा केलेला उपयोग नक्कीच या राज्यकर्त्यांना मार्गदर्शक आहे. **सध्या शासनाचा पैसा व धोरण फक्त मोजक्या कंपन्या, मोजकेच भांडवलदार व उद्योगपती यांच्या हितासाठी वापरला जात आहे. तोच पैसा बहुजनांच्या हितासाठी कसा वळवायचा हा वैचारिक संघर्ष आता सुरू झालेला आहे.**

सेवानिवृत्तीनंतर पेन्शनचे महत्त्व डी.एस.नकारा प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे दिले आहे. जेवढ्या भक्ती भावाने मी माझ्या राजाची सेवा केली तेवढ्याच भक्ती भावाने मी ईश्वराची सेवा केली असती तर हे दुर्दैवाचे दशावतार पाहण्याची वेळ माझ्यावर आली नसती ही लोकसेवकांची भावना आणि जुनी पेन्शन योजना लागू करणे म्हणजे भविष्यात येणाऱ्या सरकारच्या विरोधात पाप करणे अशी शासन सल्लागाराची भूमिका. **यामध्ये लोकसेवकांचे सेवानिवृत्तीनंतरचे जीवन अंधकारमय होणार आहे हे नक्की.**

आपण कोणाचेही ऐकायचे नाही. मागणी नसताना योजना राबवायच्या आणि **उभी हयात ज्या कर्मचाऱ्यांनी शासनाची सेवा केली त्या कर्मचाऱ्याला सेवानिवृत्तीच्या दुसऱ्या दिवशी आमच्या दारात पुन्हा दिसू नको, अशी कायदेशीर व्यवस्था करून ठेवायची ही राज्यकर्त्यांची अन्यायी प्रवृत्ती चीड आणणारी आहे.** दिनांक १ नोव्हेंबर २००५ नंतर महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षक म्हणून सेवेत आलेल्या आम्हा सर्वांसाठी एमफुक्टो चा 'सुधारित निवृत्तिवेतन योजना निषेध - विशेषांक' दिलात तो आमच्या जुन्या पेन्शनच्या लढाईत 'ब्रम्हास्त्र' म्हणून उपयोगी येईल याची मला खात्री आहे.

**आदरणीय भाऊ, कटेवर हात ठेवून, विटेवर उभा असणारा, अनंतकोटी ब्रम्हांडनायक 'श्री विठ्ठल' तुम्हाला उत्तम आरोग्य व उदंड आयुष्य देवो ही सदिच्छा.** नमस्कार. धन्यवाद,

आपला विश्वासू,
(प्रा.डॉ.आर.के.चव्हाण)

---

## *'नुटा बुलेटीन'चा सेवानिवृत्ती वेतनव्यवस्था विशेषांक*

### प्राचार्य प.सि.काणे यांचे अभिप्राय

नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाचे (NUTA) मुखपत्र असलेल्या "नुटा बुलेटीन"ची या वर्षी ५० वर्षे पूर्ण होत आहेत व या बुलेटीनची एक सुवर्ण महोत्सवी विशेषांक मालिका प्रकाशित करण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे. त्या अंतर्गत "विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी केलेला सेवानिवृत्ती वेतन व्यवस्थेसाठीचा संघर्ष" हा विशेषांक संघटनेचे विद्यमान अध्यक्ष प्रा.डॉ.प्रवीण रघुवंशी यांनी मला अगत्यपूर्वक आणून दिला ह्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या विशेषांकाचे लेखन माजी विधानपरिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख यांनी केले आहे. एक उत्तम दस्तावेज असे या विशेषांकाचे वर्णन करता येईल.

१९८० च्या पूर्वी अशासकीय महाविद्यालये व विद्यापीठातून सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापकांना सेवानिवृत्तीनंतर तुटपुंज्या अंशदायी भविष्य निर्वाह निधीतून (CPF) जी काही रक्कम मिळत असे ती रक्कम संसारिक जबाबदाऱ्या, मुलामुलींची लग्नकार्ये, नवीन घर बांधणे अशा सारख्या बाबींवर खर्च झाल्यानंतर त्यांचे वृद्धापकाळातील आर्थिक परिस्थितीच्या दैन्यावस्थेमुळे होणारे दुःखमय जीवन व त्यांची हतबलता यांचा मी प्रत्यक्ष साक्षीदार आहे.

प्राध्यापक संघटनांच्या कार्यामुळे शासकीय पातळीवरून सांसदीय आयुधांचा प्रभावशाली वापर करून प्रा.बी.टी.देशमुख प्रभृतींनी ज्या पद्धतीने अशासकीय महाविद्यालये व विद्यापीठीय प्राध्यापकांचे प्रश्न सोडविले याबद्दल हा विशेषांक एक महत्त्वाचा दस्तावेज झालेला आहे. एखादा प्रश्न यशस्वीपणे सोडविण्यासाठी किती प्रयत्न करावे लागतात, त्यासाठी सांसदीय मार्गाचा कशा कौशल्याने उपयोग करावा लागतो, त्यासाठी लोकप्रतिनिधींना किती अभ्यास करावा लागतो, या प्रश्नांचा पाठपुरावा करण्यासाठी किती श्रम करावे लागतात या गोष्टी असे विशेषांक वाचल्यावर आपल्या लक्षात येतात.

या अंकात निवृत्तिवेतन व्यवस्था : स्वरूप व प्रवास, माध्यमिक शिक्षकांना प्रथम वेतनयोजना व नंतर निवृत्तिवेतन योजना, महाविद्यालयांसाठी शासन साहाय्यित व शासन नियंत्रित वेतन वितरण व्यवस्थेसाठी केलेला संघर्ष, संघटनांच्या स्तरावरून सेवानिवृत्ती वेतन व्यवस्थेची मागणी, १९८२ चे परीक्षा बहिष्कार आंदोलन, त्या आंदोलनाची समाप्ती, सेवानिवृत्ती वेतन व्यवस्थेसाठीचा विधानपरिषदेतील तडाखेबाज व यशस्वी पाठपुरावा, १ ऑक्टोबर १९८२ पूर्वी निवृत्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्तिवेतन व्यवस्था लागू करण्याचा प्रश्न, स्वेच्छानिवृत्ती व्यवस्था लागू नसल्याचा मंत्रालयीन कारकुनांचा शोध, स्वेच्छानिवृत्तीसह सेवानिवृत्ती वेतन व्यवस्था स्वीकारण्यासाठी विकल्प उपलब्ध करण्यास्तव नकारघंटा हाणून पाडणे, व्यवस्थापकांचा हिस्सा शिक्षकांनी भरण्यासाठी असलेली जबरदस्ती हाणून पाडणे, आयुर्वेद महाविद्यालये व समाजकार्य महाविद्यालयीन शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन व्यवस्था लागू होणे, शारीरिक शिक्षण महाविद्यालयीन शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन व्यवस्था लागू होणे असे सर्व प्रश्न यशस्वी पद्धतीने व आपल्या अंगभूत कौशल्याने कसे सोडवण्यात आले या सर्वांचा बोध हा विशेषांक वाचल्यावर आपणास होतो.

प्रा.बी.टी.देशमुख यांच्या सिद्धहस्त लेखणीतून हा अंक सिद्ध झाला आहे. एक प्रकारे ज्यांना आपण निवडून देतो त्या आपल्या प्रतिनिधींनी कसा एखाद्या प्रश्नाचा पाठपुरावा करावा, ह्यासाठी किती अभ्यास करावा, किती व कसे वाक्‌चातुर्य दाखवावे याचे आपल्या परिने उद्‌बोधन करण्याचे कामही अशासारखे विशेषांक करतात असे मला मनोमन वाटते. या विशेषांकाचे लेखन करणाऱ्या माजी आमदार प्रा.बी.टी.देशमुखांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. उद्‌बोधनाचे काम त्यांनी असेच सुरू ठेवावे अशी ईच्छा व्यक्त करतो. Well done and well written B.T. congrats.

२६.१०.२०२५ — प.सि.काणे
नागपूर — (M) 9921852591

**ALL INDIA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS**

(Regd. Under Act XXI of 1860)
404, Devkunj Apartment, Road No :- 06, North Patel Nagar (Near Baba Chowk), P.O. :- Keshri Nagar, Patna-800024 :
Mobile : + 91 - 9431617320 /+91 - 9525622524, E-mail :akancphy@gmail.com/ aifucto.generalsecretary@gmail. com; Website : www.aifucto.org

AIFUCTO Special circular No 02 _2025-2026

**Dated 18.03.2025**

Greetings from AIFUCTO!

Friends we have already informed you about our proceedings and decisions reached at the XXXIII AIFUCTO Academic Conference held at Ludhiana, Punjab on March 1 and 2, 2025 in the earlier Circular. You are aware that the Conference adopted several important decisions and programmes to carry on the crusade against the undemocratic, education unfriendly policies of the central government. Among many issues that came up for detailed discussion, UGC Draft Regulation 2025, UGC decision to do away with M.Phil and Ph.D., Regulations, nomenclature and other issues relating to librarians and Physical Education teachers, career advancement and other matters relating to adjunct and part time college teachers received greater attention. Looking at the multifarious threats to the people of India at large as well as the ominous clouds hanging over education system in India in the form of NEP 2020, innumerable undemocratic, anti-student and anti-people reforms in education and the draft UGC REGULATIONS 2025, AIFUCTO adopted a movement plan, to be executed in phases to create awareness among all as also to exert pressure on the central government to rethink about its various decisions. A movement resolution was passed unanimously outlining the course of action, listed below.

1. Online webinar on March 23, 2025 to be organized by AIFUCTO.

2. Wearing of black badges on March 24, 25 and 26, 2025 and undertaking sensitization programmes such as letter campaign, public meetings, and press conferences by the respective state units at all levels.

3. Massive rally at New Delhi on April 29, 2025.

4. To prick at the hibernation attitude of the Education Minister, Government of India and the Prime Minister of India, two more special programmes will be held

i. Dharna at Bhubaneshwar on May 27, 2025

ii. Demonstration at Banaras/ Varanasi on July 12, 2025

The details of the movement programme will be worked out at the next NEC meeting on the basis of which the charter of demands, including AIFUCTO's opposition to Draft UGC Regulations 2025 and demand for repeal of NEP 2020will be circulated by General Secretary to the affiliates for their approval. We request teachers from across the country to make these programmes successful.

**Prof. Dr. M. Nagarajan**
**President AIFUCTO**
nagarajanmuta@gmail.com
Mobile number: 9443114403

**Prof.Dr.Arun Kumar**
**General Secretary AIFUCTO**
Email
aifucto.generalsecretary@gmail.com
Mobile No: 8210642139

*राज्यातील सार्वजनिक विद्यापीठामधील (अकृषि) सांविधिक पदांच्या भरती प्रक्रीयेमध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी कार्यपद्धती विहित करण्याबाबत*

***महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग***

शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२५/ई.१०५९४२१/विशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२
**दिनांक : ६ ऑक्टोबर २०२५**

**वाचा :** (१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६

(२) शासनाचे पत्र क्र.संकिर्ण-२०२५/ई-८६०४२१/विशि-१, दि. २८.०८.२०२५

(३) अवर सचिव, राजभवन यांचे पत्र क्रमांक आरबी/जीइएन-२०२४/ सीआर९२८/इडीएन ५/७९६, दि. १८.०९.२०२५

***प्रस्तावना***

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ दिनांक ०१ मार्च, २०१७ पासून लागू करण्यात आला आहे. सदर अधिनियमान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांसाठी (अकृषि) सांविधिक पदांची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर सांविधिक पदांच्या नियुक्तीसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता, अनुभव याबाबतची तरतूद सदर अधिनियमान्वये तसेच विविध शासन आदेशान्वये विहित करण्यात आलेली आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील राज्यातील अकृषि विद्यापीठांसाठी सांविधिक पदांची निवड प्रक्रिया अधिक पारदर्शक व्हावी यासाठी मा.कुलपती तथा राज्यपाल महोदयांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेले निर्देश विचारात घेऊन कार्यपद्धती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

***शासननिर्णय***

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील राज्य सार्वजनिक विद्यापीठांमधील (अकृषि) सांविधिक पदांच्या निवड प्रक्रियेसाठी सोबतच्या **परिशिष्ट-अ** नुसार कार्यपद्धती विहित करण्यात येत आहे.

२. वरील कार्यपद्धतीनुसार राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील सध्या सुरू असलेल्या सांविधिक पदांची निवडप्रक्रिया पूर्ण करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. तसेच भविष्यात होणाऱ्या राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील सांविधिक पदांच्या निवड प्रक्रियेकरता या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५१००६१८३५१९९६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(प्रताप पां.लुबाळ)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

परिशिष्ट 'अ' : अमुद्रित

**No.CIM/ 57 : : Date 15.12.2025**

**CORRECTION in the copy of the Minutes of the General Body Meeting of NUTA**

Copy of the Minutes of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION held at 12.00 noon on Sunday, the 16th November, 2025 at Aniket College of Social Work, Station Faeel, Deoli Road,Wardha is circulated in this NUTA Bulletin. If you propose to suggest any correction to the Minutes, it may be pointed out to **Dr.Nitin C. Kongre,** Secretary, NUTA, Plot No. 144, Gayatri Nagar, Behind IT Park, Nagpur-440022 by letter within 10 days from the date of posting of this Bulletin.

It will not be possible for the corrections received after the due date to be included in the List of corrections for consideration. Please send one copy of your letter to Prof. P. B. Raghuwanshi, President NUTA, Buty Plot, Near Mahajan Wadi, Rajapeth, Amravati. 444 601.

**- Dr.Nitin C. Kongre, *Secretary***

## GOVERNMENT OF INDIA
### MINISTRY OF FINANCE
(Department of Expenditure)
### RESOLUTION
New Delhi, **the 28th February, 2014**

**No.1/1/2013-E.III(A).—**The Government of India have decided to appoint the Seventh Central Pay Commission comprising of the following:—

1. Chairman - Justice Shri Ashok Kumar Mathur
2. Member - Shri Vivek Rae
3. Member - Dr. Rathin Roy
4. Secretary - Smt. Meena Agarwal

**2.** The terms of reference of the Commission will be as follows:—

**(a)** To examine, review, evolve and recommend changes that are desirable and feasible regarding the principles that should govern the emoluments structure including pay, allowances and other facilities/benefits, in cash or kind, having regard to rationalization and simplification therein as well as the specialized needs of various Departments, agencies and services, in respect of the following categories of employees:—

**(i)** Central Government employees—industrial and non-industrial;

**(ii)** Personnel belonging to the All India Services;

**(iii)** Personnel of the Union Territories;

**(iv)** Officers and employees of the Indian Audit and Accounts Department;

**(v)** Members of the regulatory bodies (excluding the RBI) set up under the Acts of Parliament; and

**(vi)** Officers and employees of the Supreme Court

**(b)** To examine, review, evolve and recommend changes that are desirable and feasible regarding the principles that should govern the emoluments structure, concessions and facilities/benefits, in cash or kind, as well as the retirement benefits of the personnel belonging to the Defence Forces, having regard to the historical and traditional parities, with due emphasis on the aspects unique to these personnel,

**(c)** To work out the framework for an emoluments structure linked with the need to attract the most suitable talent to Government service, promote efficiency, accountability and responsibility in the work culture, and foster excellence in the public governance system to respond to the complex challenges of modern administration and the rapid political, social, economic and technological changes, with due regard to expectations of stakeholders, and to recommend appropriate training and capacity building through a competency based framework,

**(d)** To examine the existing schemes of payment of bonus, keeping in view, inter-alia, its bearing upon performance and productivity and make recommendations on the general principles, financial parameters and conditions for an appropriate Incentive Scheme to reward excellence in productivity, performance and integrity,

**(e)** To review the variety of existing allowances presently available to employees in addition to pay and suggest their rationalization and simplification with a view to ensuring that the pay structure is so designed as to take these into account,

**(f)** To examine the principles which should govern the structure of pension and other retirement benefits, including revision of pension in the case of employees who have retired prior to the date of effect of these recommendations, keeping in view that retirement benefits of all Central Government employees appointed on and after 01.01.2004 are covered by the New Pension Scheme (NPS),

**(g)** To make recommendations on the above, keeping in view:

**i.** the economic conditions in the country and the need for fiscal prudence;

**ii.** the need to ensure that adequate resources are available for developmental expenditures and welfare measures;

**iii.** the likely impact of the recommendations on the finances of the State Governments, which usually adopt the recommendations with some modifications;

**iv.** the prevailing emolument structure and retirement benefits available to employees of Central Public Sector Undertakings; and

**v.** the best global practices and their adaptability and relevance in Indian conditions.

**(h)** To recommend the date of effect of its recommendations on all the above,

**3.** The Commission will devise its own procedure and may appoint such Advisors, Institutional Consultants and Experts, as it may consider necessary for any particular purpose. It may call for such information and take such evidence, as it may consider necessary. Ministries and Departments of Government of India shall furnish such information and documents and other assistance as may be required by the Commission. The Government of India trusts that State Governments, Service Associations and others concerned will extend to the Commission their fullest cooperation and assistance.

**4.** The Commission will have its Headquarters in Delhi.

**5.** The Commission will make its recommendations within 18 months of the date of its constitution. It may consider, if necessary, sending interim reports on any of the matters as and when the recommendations are finalized.

**RATAN P. WATAL, Secy.**

*****

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Dr.Mahendra V. Mete, 38, Ganediwal Layout, Camp, Amravati-444602. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade, 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 05.12.2025) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.12.2025**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

To,......................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................